परभणी जिल्ह्यातील चांभार जातीच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे समाजशास्त्रीय अध्ययन

A Sociological Study of Socio-Economic Condition of Chambhar Caste in Parbhani District

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

सामाजिक शास्त्रे विद्याशाखे अंतर्गत
सामाजशास्त्र विषयातील पीएच.डी.पदवी
करीता सादर करावयाचा संशोधनआराखडा

संशोधक

मधुकर दत्तात्रय ठोंबरे
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
स्व.नितीन कला व विज्ञान महाविद्यालय पाथरी,
ता. पाथरी , जि. परभणी

मार्गदर्शक

प्रा. डॉ. चव्हाण डी.एस.
संशोधक मार्गदर्शक
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
शारदा महाविद्यालय, परभणी

प्रस्तावना :

भारतीय समाज जीवनात जाती संस्था एक समर्थ शक्ती म्हणून उभी आहे. समाज व्यवस्थेत मानवाचे वेगवेगळ्या धार्मीक, आर्थिक ,वांशीक, प्रकारात विभाजन आढळून येते. भारतीयांचे सामाजिक सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय जिवन जातीने व्यापलेले आहे. जातीय व्यवस्था भारतीय समाज व्यवस्थेचे प्रभेदक वैशिष्ट्ये मानले जाते. भारतीय समाज रचना टिकवण्यासाठी श्रेष्ठ कनिष्ठ तत्वावर व व्यवसाय विभागणीवर अनेक जाती अस्तित्वात आलेल्या दिसून येतात. डॉ.श्री.व्य.केतकर यांनी आपल्या अभ्यासातून भारतीय समाजात चार हजार एवढ्या जाती अस्तित्वात असल्याचे स्पष्ट केले आहे. अनेक पाश्चात्य व भारतीय समाजशास्त्रज्ञानी जाती व्यवस्थेच्या उत्पत्ती बाबत वेगवेगळे सिद्धांत मांडलेले आहेत. यामध्ये पारंपारीक सिद्धांत अबे डुबॉयस यांनी मांडलेल्या राजकीय सिद्धांत, होकार्ट आणि सेनार्ट यांनी मांडलेला धार्मिक सिद्धांत, नेसफोल्ड यांचा व्यावसायिक सिद्धांत तसेच प्राचीन कालीन वाङ्.मयात वेद, उपनिषेद, महाकाव्य व स्मृती वाङ्.मयात आणि ऋग्वेदाच्या पुरुसूकतात जाती व्यवस्थेच्या उत्पत्ती सबंधी प्राचीन आधार आढळतो. भारतीय समाज शास्त्रज्ञ डॉ.गोविंद घुर्वे, डॉ.इरावती कर्वे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, एम.एन.श्रीनिवास, एन.के.दत्त यांनी जाती उत्पत्ती सबंधी विचार मांडले. 'जात' या शब्दाला इंग्रजीत 'Caste' हा शब्द वापरला जातो. या शब्दाचा अर्थ प्रजाती किंवा जन्मभेद असा होतो. जन्मभेदाच्या आधारे निर्माण झालेली समाज व्यवस्था म्हणजे जातीभेद होय.

प्राचीन युरोपमधील निरीक्षकांच्या मते समाजाची विभागणी करुन त्यात आपले वर्चस्व टिकवून ठेवण्यासाठी पुरोहिताची चातुर्य पुर्ण अशी राजनितीक योजना होती. जातीला धर्माचा आधार देवून ही प्रथा जनतेत रुजवली. डॉ.घुर्वे म्हणतात, इंण्डोआर्यन संस्कृतीतील ब्राम्हणांची निर्मीती म्हणजे भारतातील जातीय व्यवस्था होय.गंगा यमुनेच्या खोऱ्यात जाती संस्थेचे संगोपन झाले व येथूनच जाती संस्थेचा प्रसार झाला.

भारतात शुद्र, अस्पृश्य, सवर्ण, हरिजन व दलित इत्यादी नावांनी अस्पृश्यांना ओळखले जाते. इ.स.1935 मध्ये ब्रिटीश शासनाने मागासलेल्या जातींना विशेष सवलती देण्यासाठी जो कायदा मंजुर केला त्या कायद्यात अनुसुचित जाती हा शब्द प्रयोग प्रथम करण्यात आला. अनुसुचित जाती म्हणजे कोणत्या जाती हे राज्य घटनेच्या 366 व्या कलमात सांगितले आहे. ज्या जाती वंश किंवा जन जाती अथवा जातीचे उपभाग यांचा भारतीय शासन संस्थेने अनुसुचित जाती म्हणून उल्लेख केला त्या सामाजिक गटांना अनुसूचित जाती असे म्हणतात. या अनुसुचित जातीमध्ये चांभार ही जात प्रमुख जात म्हणून ओळखली जाते. ग्रामीण अर्थव्यवस्थेत बलुता पध्दती अतिशय महत्वाची होती. ही पध्दती रुढी व परंपरावर आधारलेली होती. यामध्ये वेतनाचे व पगाराचे तत्व नव्हते. प्रत्येक जातीचा स्वतंत्र व्यवसाय होता. हा व्यवसाय

परंपरेने, जन्म व जात या आधारावर सातत्याने टिकुन राहीला. प्रत्येक जातीला आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी दुसऱ्या जातीची मदत घ्यावी लागे चांभार जातीची पारंपारिक कार्य सांगताना श्री.त्रि.ना.अत्रे यांनी आपल्या **'गावगाडा'** या पुस्तकात बलुता पध्दतीचे समर्पक वर्णन केले आहे. ते म्हणतात,'कुणब्याने गाव वसवीले आणि काळी उचलली खरी त्यांचा धंदा पार पाडण्याला व प्रपंचाची अनेक कामे चालण्याला त्याला अडाण्यांच्या जातीमध्ये धंद्याची गरज होती म्हणून कुणब्यांने आपल्या बरोबरच गावात अडाणी आणले.' यामध्ये ज्यांचे व्यवसाय शेतकऱ्याला जास्त महत्त्वाचे होते त्यांना बलुतेदार व ज्यांचे व्यवसाय कमी उपयुक्त त्यांना आलुतेदार म्हणतात चांभार हा बलुतेदार शेतकऱ्यासाठी अतीशय महत्वाचाआहे.महाष्ट्रातील जवपास सर्व जिल्ह्यांनमध्ये व जिल्ह्यातील प्रत्येक गावात चांभार हा बलुतेदार आढळतो. तरीही परभणी जिल्ह्यामध्ये जवळपास सर्वच गावात चांभार समाज दिसून येतो त्याची पारंपारिक कार्ये मोट शिवणे, मोटेला ठिगळ लावणे, जुना जोडा, चाबुक सांधणे, पेरणीच्या वेळी वादी, आसुड, साबत्या करुन देणे इत्यादी कामे चांभार बलुत्यात करतो. परंतु नवीन मोटा तयार करणे नवीन जोडा तयार करणे ही कामे रोख पैशाने करतो.

विषयाची निवड :

चांभार या जातीमध्ये अनेक उपजाती आहेत. यामध्ये चांभार, ढोर, मोची इत्यादी जातींचा समावेश आहे. चांभार जात ही हिंदु असून ती अस्पृश्य गटात मोडते. म्हणून त्याचे सामाजिक जिवन हिंदुधर्मातील रुढी, प्रथा परंपरेनुसार आहे. चांभार जात ही धर्मावर व देवावर श्रध्दा ठेवणारी आहे. म्हणून तो नित्यनेमाने धार्मिक पुजा करतो. परंतु त्याला अस्पृश्य असल्यामुळे मंदिरात प्रवेश दिला जात नाही. म्हणून धार्मीक विधीसाठी धर्मपंडिताची मदत घ्यावी लागते. चांभार जातीमध्ये मोठ्या प्रमाणात अज्ञान व निरक्षरता असल्यामुळेअंधश्रध्दांना बळी पडतात. अनेक देवांना नवस बोलतात, उपवास, तिर्थयात्रा करतात. चांभार समाजाची घरे अस्पृश्य असल्यामुळे गावाबाहेर असतात. त्यांच्यावर व्यवहाराच्या बाबतीत सामाजिक बंधने लादली जातात. त्यामुळे चांभार जातीला आर्थिक व मानसिक गुलामगिरी करावी लागते. त्याच बरोबर अनेक वेळा खेड्यामध्ये चांभारांना वेठबिगारी करावी लागते. त्यांचा समाजातील दर्जा कनिष्ठ लेखला जातो. म्हणुनच अशा चातुर्यवर्ण समाज रचनेत अडकलेल्या चाभांर जातीचा विकास होऊ शकला नाही.प्रस्तुत संशोधन कार्य करतांना चांभार जातीच्या सामाजिक व आर्थिकस्थितीचे समाजशास्त्रीय अध्ययन करणे आवश्यक वाटते.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :

1. चांभार जातीच्या वैयक्तिक व कौंटुबिक माहितीच्या आधारे त्यांच्या वर्तमान स्थितीचे वर्णन व विश्लेशन करणे.
2. चांभार जातीच्या कल्याणासाठी असणाऱ्या शासनाच्या विविध योजनांचा लाभ चांभार जातीला किती मिळाला याचा अभ्यास करणे.
3. चांभार जातीचा आर्थिक जीवनासबंधीचा अभ्यास करणे.
4. चांभार जातीच्या धार्मिक व सांस्कृतिक जीवनाचा अभ्यास करणे.
5. चांभार जातीच्या विविध प्रश्नांचे व समस्यांचे स्वरुप स्पष्ट करणे व उपाय सुचवणे.

गृहीतके

1. ग्रामीण चांभार जातीतील व्यक्तींच्या वैयक्तिक व कौंटुबिक स्थितीत बदल घडुन आला आहे.
2. ग्रामीण चांभार जातीतील व्यक्तींचे जीवन सांस्कृतिक व धार्मिक बदलामुळे प्रभावित झालेले दिसुन येते.
3. सामाजिक कायद्यामुळे चांभार जातीच्या सामाजिक स्थितीमध्ये बदल घडुन आला आहे.
4. अनुसूचित जातींच्या संदर्भातील शासकीय योजनांचा लाभ चांभार जातीतील व्यक्तींना झालेला नाही.
5. चांभार जातीमध्ये सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक समस्यामुळे या जातीचा दर्जा घसरलेला आहे.

संशोधन विषयाचे महत्व

आधुनिक काळात नवीन तंत्रज्ञानामुळे चांभार जातीचा पारंपारिक व्यवसाय मोडकळीस आला आहे. कारखान्यामधुन नवीन आकर्षक चप्पल बुट तयार केले जातात. म्हणून अनेक कारागिरांना स्थलांतर करावे लागत आहे. याचा परिणाम म्हणुन चांभार जातीच्या सामाजिक व आर्थिक जीवनात अनेक अडचणी आल्या आहेत. यामध्ये व्यवसायाबद्दल योग्य मार्गदर्शन मिळत नाही, भांडवल पुरवठा होत नाही. या व्यवसायाला समाजात प्रतिष्ठा मिळत नाही. त्यामुळे कारागिर आर्थिक दृष्ट्या दुर्बल बनला आहे. चांभार जातीच्या व्यवसाय कलेचा ऱ्हास होऊ लागला आहे. तेंव्हा अशा असंख्य समस्येवर मात करण्यासाठी चांभार जातीची सामाजिक, आर्थिक स्थिती अभ्यासने आवश्यक आहे. म्हणून प्रस्तुत संशोधन कार्य हाती घेतले आहे.

संशोधन आराखडा

प्रस्तुत संशोधन हे चांभार जातीच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक स्थितीचे समाजशास्त्रीय अध्ययन करण्यासाठी आहे. आजपर्यंत अभ्यासाकाकडून चांभार जातीचा पुरेसा अभ्यास झालेला नाही. त्यामुळे परभणी जिल्ह्यातील काही निवडक गावातल्या चांभार जातीच्या सामाजिक, आर्थिक स्थितीचे अध्ययन करुन त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी शासनाकडून दिल्या जाणाऱ्या योजना चांभार जातीसाठी काही प्रमाणात उपयुक्त ठरल्या आहेत. तरीही या प्रश्नांची शास्त्रशुध्द माहिती मिळवण्यासाठी परभणी जिल्ह्यातील चांभार जातीच्या सामाजिक आर्थिक स्थितीचे समाजशास्त्रीय अध्ययन हा विषय संशोधनासाठी निवडलेला आहे. प्रस्तुत संशोधन हे वर्णनात्मक संशोधन आराखड्यात येते.

संशोधन क्षेत्र व नमुना निवड

प्रत्येक तालुक्यातील निश्चित अशा नमुना निवड पध्दतीने चांभार जातीची लोकसंख्या असणाऱ्या
पाच गावांची निवड करण्यात येईल. अशा एकुण 45 गावांची अभ्यासासाठी निवड केली जाईल. निवडलेल्या प्रत्येक गावातुन प्रस्तुत संशोधनासाठी चांभार जातीची निवड करण्यात येईल.संभाव्यता नमुना निवड पध्दती अंतर्गत साधायादृच्छिक नमुना निवडीत ग्रीड/पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

नमुना आकार

संशोधन कार्य हे सुक्ष्मरित्या होण्यासाठी बृहत आराखड्यात कार्य करणे शक्य नसल्या कारणाने संदर्भ क्षेत्रातील काही प्रातिनिधीक स्वरुपात नमुना निश्चित करुन संशोधन करण्यात येईल त्याच बरोबर संशोधन क्षेत्रातील प्रत्यक्ष पाहणी करुन 200 एकक नमुना म्हणून वापरण्यात येईल.

नमुना निवडण्याची पध्दत

नमुना निवडत असतांना दोन प्रकारात विभागणी केली आहे. संभाव्यता नमुना निवड आणि गैर संभाव्यता नमुना निवड प्रस्तुत संशोधन कार्य हे संभाव्यता नमुना निवडी अंतर्गत साधा यादृच्छिक नमुना पध्दतीनुसार म्हणजेच ग्रीड किंवा कोटा पध्दतीनुसार वापरण्यात येईल. कारण संदर्भ क्षेत्रातील संशोधकाच्या सोईनुसार निश्चित आकडेवारी प्राप्त असल्यामुळे प्रस्तुत संशोधन नमुना निवड करण्यात येईल.

गुणात्मक व संख्यात्मक संशोधन पध्दती

सामाजिक शास्त्रातील बहूसंख्य संशोधन पध्दती पाहवयास मिळतात त्यातल्यात्यात गुणात्मक व संख्यात्मक पध्दत ही अत्यंत महत्व पूर्ण पध्दत आहे. म्हणून प्रस्तुत संशोधन कार्य करण्यासाठी आवश्यकते नुसार या पध्दतीचा वापर करण्यात येईल.

तथ्य संकलन, तंत्र व पध्दती :

संशोधनाचे प्राथमीक स्त्रोत :

प्रस्तुत संशोधनाची प्राथमिक माहिती मिळविण्यासाठी मुलाखत अनुसूची व निरीक्षण या तंत्राचा उपयोग केला जाईल. निवडलेल्या नमुना उत्तरदात्याकडुन अनुसूची तंत्राच्या सहाय्याने माहिती मिळविली जाईल.अनुसूची मध्ये संशोधनाच्या उद्देशानुसार प्रश्न विचारले जातील साधारणपणे एक वर्षाच्या कालखंडातील माहिती गोळा केली जाईल.

संशोधनाचे दुय्यम स्त्रोतः

दुय्यम सामुग्रीच्या उपलब्धतेसाठी निरनिराळी वाचनालये, ग्रंथालये, यांना भेटी देऊन ग्रामीण चांभार जातीचा सध्याच्या दर्जाचे प्रश्नाविषयी झालेल्या संशोधनाचे संदर्भ मिळवले जातील. त्याचबरोबर जनगणना अहवाल, सेवाभावी संस्थांचे नियतकालिके, मासिके आणि संशोधन पत्रिका या साधनाद्वारे दुय्यम माहिती मिळवली जाईल.

संशोधन क्षेत्राची व्याप्ती आणि मर्यादा

संशोधन करण्यासाठी विश्वव्यापी हेतू असणे आवश्यक असते परंतु विश्वव्यापी क्षेत्र निवडल्यास सुक्ष्म निष्कर्ष काढणे अवघड जाते म्हणून संशोधन क्षेत्राची व्याप्ती निश्चित करणे आवश्यक आहे. प्रस्तुत संशोधन कार्य हे परभणी जिल्ह्यातील नऊ तालूक्यापूरतेच मर्यादीत आहे.

सैध्दांतीक दृष्टीकोन

सामाजीक शास्त्रातील संशोधन कार्य करतांना सिध्दांत मांडणी करणे आवश्यक असते. आपले संशोधन कार्य कोणत्याना कोणत्या तरी सिध्दांतास जोडणे आवश्यक ठरते. प्रस्तुत संशोधन कार्य हे डॉ.जी.एस.घुर्ये यांचा जाती विषयक सिध्दांत व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जाती विषयक दृष्टीकोन व हटन, हबर्ट रिस्ले, डि.पी.मुखर्जी,इरावती कर्वे अशा वेगवेगळ्या जाती विषयक सिध्दांताचा सुक्ष्म अभ्यास करुन प्रस्तुत संशोधन कार्य सिध्दांतास लागू करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

1) **तथ्य संस्करण :**

   तथ्य संकलन प्राप्त झालेल्या माहिती च्या आधारे व्यवस्था निर्माण करण्यासाठी त्यात संस्करण करणे आवश्यक असते. या कामासाठी संगणकाचा उपयोग केला जाईल. प्रामुख्याने विविध सांख्यीकीय पध्दतीच्या सहाय्याने वर्गीकरण व सारणीकरण करुन तथ्य संस्करण करण्यात येईल. अशा प्रकारे तथ्यात व्यवस्था व सुसंगती लावल्यानंतर निष्कर्ष व उपाय सुचवले जातील.

प्रकरणीकरण

1. **प्रस्तावना** :

   भारतीय समाजातील जाती निर्मीतीचे सिद्धांत, ग्रामीण बलुतेदार पध्दती, चांभार जातीचे स्थान, चांभार जात व सामाजिक परिवर्तन, चांभार समाजाची उत्क्रांती , चांभार समाजाची संस्कृती ,चांभार समाजाची सामाजिक व आर्थिक परिस्थीती,प्रस्तुत संशोधनाची आवश्यकता,संशोधनपर साहित्याचा आढावा.

2. **संशोधन पध्दती**

   विषयाची निवड ,संशोधन विषयाची उद्दिष्ट्ये ,गृहीतके.संशोधन विषयाचे महत्व , नमुना आकार - 200 एकक, नमुना निवडण्याची पध्दत,गुणात्मक व संख्यात्मक संशोधन पध्दत, तथ्य संकलन, व्याप्ती आणि मर्यादा, सैध्दांतिक दृष्टिकोन

3. **चांभार जातीची सामाजिक, आर्थिक स्थिती**
4. **चांभार जातीच्या विकासामध्ये शासकीय योजनेची भूमिका**
5. **गृहितकृत्याची पडताळणी, सैध्दांतिक संदर्भ**

संदर्भ ग्रंथ सूची

1. केतकर,2010, 'महाराष्ट्र ज्ञानकोष, खंड 14 ',महाराष्ट्रातील ज्ञानकोष मंडळ,शनिवार पेठ, पुणे, पृष्ठ क्र. 214
2. देशपांडे /बर्दापूरकर, 2003 'भारतीय सामाजिक संरचना', विद्या बुक्स, औरंगपुरा औरंगाबाद, पृष्ठ क्र. 12,14,18
3. चांदेकर,1999' सामाजिक क्रांतीचे प्रणेते संत शिरोमणी गुरु रविदास', समता प्रकाशन,डॉ.बाबासाहेब आंबेडकर कॉलनी, लष्करी बाग, नागपूर 1999, पृष्ठ क्र. 17
4. आगलावे, 'भारतातील सामाजिक समस्या', विद्या प्रकाशन रुईकर मार्ग नागपूर, पृष्ठ क्र. 218
5. शिंदे सत्यदेव,'चर्मकार', सुगावा प्रकाशन, 562 चित्रशाळा इमारत, सदाशिव पेठ, पुणे पृष्ठ क्र. 75
6. आहुजा राम, 2010, भारतीय समाज,रावत पब्लिकेशन,जवाहर नगर,जयपूर,पृष्ठ क्र.71
7. आगलावे प्रदिप,2010,सामाजिक संशोधन पध्दती शास्त्र व तंत्रे, श्री साईनाथ प्रकाशन,धरमपेठ, नागपूर,पृष्ठ क्र.12,13
8. वाघ,जाधव,पगारे,2015,भारतीय समाज संरचना व बदल,प्रशांत पब्लिकेशन,जळगाव,पृष्ठ क्र.33
9. कदम विश्वास/गावंडे,2016,संशोधन पध्दती, कैलास पब्लिकेशन ,औरंगपूरा, औरंगाबाद,पृष्ठ क्र.28,29
10. चंगोले पी.एस.,1994,राजर्षी शाहू आणि कांशीराम,गुरु रवीदास प्रकाशन, नागपूर.
11. चव्हाण रामनाथ,1989,जाती आणि जमाती,मेहता पब्लिसिंग हाऊस,सदाशीव पेठ,पूणे.
12. बांदिवाडेकर,विश्वचर्मकारांचे ग्रंथाली प्रकाशन,दादर,मुंबई.
13. गिरगावकर वर्षा,1996,लोक आणि भूमी, कार्यकारी संपादक, महाराष्ट्र शासन मुंबई.
14. जिल्हा व्यवस्थापक,1982,संत रोहिदास चर्मउद्योग विकास महामंडळ, जिल्हा कार्यालय,परभणी.

मार्गदर्शक
डॉ.चव्हाण डी.एस.
संशोधक मार्गदर्शक
समाजशास्त्र विभाग प्रमुख
शारदा महाविद्यालय,परभणी

संशोधक विद्यार्थी
मधुकर दत्तात्रय ठोंबरे
समाजशास्त्र विभाग प्रमुख
स्व.नितीन कला व विज्ञान महाविद्यालय,पाथरी